# ग्राम सुरक्षा यंत्रणा

**1800 270 3600**

## सहाय्यम् सर्वतो सहस्त्रशः

बहुधा जगातील सर्वोत्तम आपत्कालीन संपर्क यंत्रणा

Scanned with CamScanner

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## ग्राम सुरक्षा यंत्रणा वापराबाबत नागरिकांना आवाहन

आपल्या पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

आपल्या पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गावांत ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यरत करण्यात आली असुन चोरी-दरोड्याची घटना, महिलांसंदर्भातील गुन्हे, लहान मुले हरविणे, वाहन चोरी, गंभीर अपघात, वन्य प्राण्यांचा हल्ला, आग जाळीताची घटना इ. घटनांमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या वापरामुळे तातडीने मदत मिळणे व दुर्घटनांना आळा घालणे प्रभावी पणे शक्य होत आहे. आपल्या पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांनी ग्रामसुरक्षा यंत्रणेचा संकटाच्या वेळी प्रभावी वापर करावा व पोलीस यंत्रणेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पुस्तकाची डिजीटल कॉपी डाऊनलोड करण्यासाठी बारकोड स्कॅन करा.

– आपत्कालीन संपर्क –

**1800 270 3600**

Scanned with CamScanner




**हिवरेबाजार :** ग्रामसुरक्षा यंत्रणेचा प्रारंभ करतांना अखिल कुमार, पोपटराव पवार, जिल्हाधिकारी अभय महाजन, प्रांताधिकारी उज्वला गाडेकर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक कोल्हे, डी. के. गोरडे, तहसीलदार सुधीर पाटील, सहायक पोलिस निरीक्षक किशोर परदेशी.

# ग्रामसुरक्षा यंत्रणा प्रभावी ठरेल : पोपटराव पवार

**नगर, ता. २१ :** ग्रामसुरक्षा यंत्रणा ग्रामीण भागासाठी प्रभावी ठरेल, असा विश्वास राज्य आदर्शगाव प्रकल्प व संकल्प योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी व्यक्त केला.

हिवरेबाजार येथे आज आपत्कालीन ग्रामसुरक्षा यंत्रणेचा प्रारंभ केंद्राच्या जलसंसाधन नदी विकास व गंगा पुनर्जीवनाचे सहसचिव अखिल कुमार यांच्या हस्ते झाला. जिल्हाधिकारी अभय महाजन, प्रांताधिकारी उज्वला गाडेकर, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक कोल्हे, तहसीलदार सुधीर पाटील, सहाय्यक पोलिस निरिक्षक किशोर परदेशी उपस्थित होते. ग्रामसुरक्षा यंत्रणेचे डी.के. गोरडे यांनी प्रात्यक्षिक दाखविले. आपत्कालीन स्थितीत ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या टोल-फ्री क्रमांकावर फोन केल्यास एकाच वेळी अनेक जणांशी संपर्क साधला जाईल. त्यातुन इतरांना सावध करता येईल, तसेच मदतीसाठी बोलाविता येईल ही यंत्रणा ग्रामपंचायतीमार्फत राबवली जाणार आहे. त्यासाठी वर्षाला २५० रूपये शुल्क आकारले जाणार आहे. या यंत्रणेमुळे चोरी व दरोड्यांना आळा बसू शकेल. पोलिस प्रशासनालाही त्याचा फायदा होईल, असे आदर्श गांव हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार यांनी सांगितले.

सकाळ वृत्तसेवा

Scanned with CamScanner

# ग्राम सुरक्षा यंत्रणा

## जगातील सर्वोत्तम आपत्कालीन संपर्क यंत्रणा

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | माहिती | पान नं. |
|---|---|---|
| १ | ग्राम सुरक्षा यंत्रणेबाबत सर्व साधारण माहिती | ३ |
| २ | ग्राम सुरक्षा यंत्रणेचे फायदे व वैशिष्टये | ३-४ |
| ३ | ग्राम सुरक्षा यंत्रणेचे महत्वाचे नंबर | ४ |
| ४ | ग्राम सुरक्षा यंत्रणा गावात सुरू करणेबाबत | ४ |
| ५ | ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी होणेबाबत | ४ |
| ६ | ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रत्यक्ष वापराबाबत | ५ ते १२ |
| ७ | ग्राम सुरक्षा यंत्रणेचे शुल्क (चार्जेस) | १३ ते १४ |
| ८ | ग्राम सुरक्षा यंत्रणेचा झालेला वापर | १५ |




मा. श्री. विश्वास नांगरे पाटील (IPS), आयुक्त, नाशिक शहर पोलीस, यांचे उपस्थितीत नाशिक शहरातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत नागरी सुरक्षा यंत्रणेची प्रात्यक्षिके घेण्यात आली.



Scanned with CamScanner




संकट काळात एकाच वेळी कॉल करून सर्व गावकऱ्यांना सावध करणे किंवा मदतीला बोलावण्यासाठी सर्वोत्तम यंत्रणा
सर्व गावकऱ्यांना यंत्रणेत सहभागी करून घ्या.



Scanned with CamScanner

# १. सर्वसाधारण माहिती

**१.१ ग्राम सुरक्षा यंत्रणा नेमकी काय आहे ?**

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात मानवाने परस्परांशी संपर्कासाठी नानाविध साधने बनविली व त्याचा वापर करून मानव प्रगतीही करत आहे. संपर्काची कधी नव्हे एवढी प्रचंड साधने आज जगात उपलब्ध असुन सुध्दा प्रत्यक्ष संकट काळात म्हणजे आग, चोरी, दरोडा, लहान मुल हरविणे. महिलांची छेडछाड, वाहन चोरी, शेतातील पिकाची चोरी, गंभीर अपघात, वन्य प्राणी, बिबट्या, तरस, लांडगा यांचा हल्ला आदी घटनांमध्ये तातडीने जवळपास असणाऱ्या नागरिकांशी तत्काळ संपर्क साधुन मदत मागणे आजच्या या उपलब्ध संपर्क साधनांद्वारे शक्य होत नाही. ग्राम सुरक्षा यंत्रणा ग्रामिण भागासाठी सुरू करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षापासुन शेकडो गावांत सदर यंत्रणा कार्यान्वित आहे. ग्रामस्थ आपापले मोबाईल नंबर आपल्या गावातील ग्राम सुरक्षा यंत्रणेत नोंदवुन यंत्रणा वापरत आहेत. संपूर्ण भारतासाठी वापरता येणारा टोल फ्री नंबर **18002703600** वर नोंदणी केलेल्या नागरिकाने संकट काळात फोन केल्यास त्याचा आवाज परिसरातील हजारो नागरिकांना त्वरित मोबाईलवर ऐकु जातो. परिसरातील नागरिकांना घटना घडत असतांनाच तीची माहिती मिळाल्याने तातडीने मदत करणे व नुकसान टाळणे शक्य होते.

**१.२ ग्राम सुरक्षा दल व ग्रामसुरक्षा यंत्रणा एकच आहेत का ?**

नाही. ग्राम सुरक्षा दल व ग्रामसुरक्षा यंत्रणा या दोन वेगवेगळ्या संकल्पना आहेत.

**१.३ ग्राम सुरक्षा यंत्रणेचे नेमके फायदे काय ?**

घटनाग्रस्त नागरिकांना परिसरातील नागरिकांची तातडीने मदत मिळते.
गावातील कार्यक्रम/घटना विना विलंब ग्रामस्थांना एकाच वेळी कळतात.
अफवांना आळा घालणे शक्य होते.
प्रशासनाला नागरिकांशी जलद संवाद साधता येतो.
पोलीस यंत्रणेस कायदा सुव्यवस्था कायम राखणे कामी नागरिकांचे सहकार्य मिळते.

## ग्राम सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्ये

- संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा.
- गावासाठी यंत्रणा सुरू करणे व सहभागी होण्यासाठी सोपी पध्दत.
- संपूर्ण भारतासाठी एकच टोलफ्री नंबर **1800 270 3600.**
- यंत्रणेत सहभागी असलेला कोणताही नागरिक आपत्ती काळात संपूर्ण परिसराला सावध करू शकतो.
- संदेश देणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच संदेश कॉल स्वरूपात परिसरातील नागरिकांना मिळतो.
- दुर्घटनेचे स्वरूप, तीव्रता, ठिकाण कळल्याने गावकऱ्यांना विना विलंब व नियोजनबध्द मदत करता येते.
- नियमानुसार दिलेले संदेशच स्वयंचलित रित्या प्रसारित होतात.
- नियमाबाह्य दिलेले संदेश/अपूर्ण संदेश रद्द होतात व प्रसारित होत नाहीत.
- एका गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावच्या दिशेने गेल्यास त्या गावालाही सावध करणे शक्य.
- वाहन चोरीचा संदेश आजूबाजूच्या १० किमी परिसरातील सर्व दिशांच्या गावांना तत्काळ



Scanned with CamScanner

मिळतो

- ✲ घटनच्या तीव्रतेनुसार कॉल रिसीव्ह होत नाही तोपर्यंत रिंग वाजते.
- ✲ संदेश पुढील १ तास पुन्हा पुन्हा ऐकण्याची सोय.
- ✲ कोणत्याही वेळी आपल्यासाठी संदेश तपासण्याची सोय.
- ✲ चुकीचा संदेश किंवा मिसकॉल देणारे नंबर आपोआप ब्लॉक लिस्ट होतात.
- ✲ गावाबाहेर दुसऱ्या गावात अपघातग्रस्त नागरिकाचा संदेश घटना घडलेल्या परिसरातही प्रसारित होतात.
- ✲ सरकारी कार्यालये/पोलीस स्टेशन आदींना आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना किंवा विशिष्ट एक किंवा एकापेक्षा जास्त गावांना किंवा कर्मचाऱ्यांना सूचना / आदेश देता येणे शक्य

**ग्राम सुरक्षा यंत्रणेचा आपत्कालीन संपर्क नं. 1800 270 3600**
ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल कसा करावा याच्या सरावासाठी नंबर **9595084943**
ग्राम सुरक्षा यंत्रणेचे नियम / अटी **022 48931236** या नंबरवर उपलब्ध

## २. यंत्रणा सुरू करणेबाबत

### २.१ ग्राम सुरक्षा यंत्रणा गावात सुरू कशी करावी ?

प्रत्येक गावात पोलीसस्टेशन कडून ग्राम सुरक्षा यंत्रणा सुरू करण्यात येत आहे. स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष व गावातील सामाजिक कार्यकर्ते यांची एकत्रित सभा घेवुन ग्राम सुरक्षा यंत्रणेचे प्रात्यक्षिक देण्यात येते. पंचायत समिती कार्यालयात स्थानिक पोलिस ठाण्याचे पोलीस निरिक्षक व गट विकास अधिकारी यांचे उपस्थितीत ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक यांना ग्राम सुरक्षा यंत्रणेचे प्रात्यक्षिक देण्यात येते

## ३. यंत्रणेत सहभागी होणेबाबत

### ३.१ ग्राम सुरक्षा यंत्रणेत कोण सहभागी होऊ शकते ?

ज्या गावात ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे त्या गावातील प्रत्येक नागरिक ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी होवू शकतो. आपल्या गावात ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित आहे किंवा नाही यासाठी ग्रामपंचायत कार्यालय किंवा गावातील पोलीस पाटील यांचे कडे संपर्क करावा.

### ३.२ ग्रामस्थांनी यंत्रणेत सहभागी होण्यासाठी काय करावे ?

गावात ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असेल तर ग्रामपंचायत कार्यालय किंवा ग्रामपंचायतने ठरवुन दिलेल्या व्यक्तींशी संपर्क करून आपला मोबाईल नंबर ग्रामसुरक्षा यंत्रणेत नोंदवुन घ्यावा.



Scanned with CamScanner

**३.३ ग्राम सुरक्षा यंत्रणेत गावातील किती लोकांनी सहभागी व्हायला हवे याला काही मर्यादा आहे का ?**
नाही. ग्राम सुरक्षा यंत्रणेत गावातील किती नागरिकांनी सहभागी व्हावे यासाठी कोणतेही बंधन नाही.

**३.४ ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी झाले नंतर काही यंत्र किंवा मोबाईल अॅप चा वापर करावा लागतो का ?**
नाही. ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी झालेनंतर गावात कोणतेही यंत्र लावण्यात येत नाही किंवा नागरिकांना कोणत्याही मोबाईल अॅप चा वापर करावा लागत नाही.

## ४. यंत्रणा वापराबाबत

**४.१ संकट काळात कोणत्या नंबरवर कॉल करावा ?**
संकट काळात परिसरातील नागरिकांना सावध करणे किंवा त्यांची मदत मागण्यासाठी **1800 270 3600** या टोलफ्री नंबरवर कॉल करावा. यंत्रणा पूर्णपणे स्वयंचलित आहे. कॉल करतांना स्वतःचे नाव, घटनेचे ठिकाण, घटनेचे स्वरूप स्पष्ट शब्दांत व नागरिकांना समजेल अशा पध्दतीने सांगावे. कॉल करण्याअगोदर शब्द रचना शक्यतो कागदावर लिहुन घ्यावी व मगच कॉल करावा. संदेश २५ सेकंदांपेक्षा मोठा नसावा.

**४.२ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल केल्यानंतर किती वेळात ग्रामस्थांना मिळतो ?**
ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल करून संदेश पध्दतीने व नियमानुसार दिलेला असेल तर १ ते ३ मिनिटांत सर्व ग्रामस्थांना संदेश मिळालेला असतो.

**४.३ ग्राम सुरक्षा यंत्रणेचा नंबर मोबाईल मध्ये सेव्ह करण्याची काही विशिष्ट पध्दत आहे का ?**
होय. ग्राम सुरक्षा यंत्रणेचा टोलफ्री नंबर **1800 270 3600** फोन बुक मध्ये **'AAA HELP'** किंवा **'अअअ'** मदत याच नावाने सेव्ह करावा. अशा प्रकारे सेव्ह केलेला नंबर फोनबुक मध्ये सुरूवातीलाच दिसतो व आपत्ती काळात नंबरची शोधाशोध करावी लागणार नाही.

**४.४ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल कसा करावा याच्या सरावासाठी काही सोय आहे का ?**
होय. ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल कसा करावा याच्या सरावासाठी **9595 08 4943** या नंबरवर कॉल करून सराव करू शकता. या नंबरवर केलेला कॉल गावात प्रसारित न होता स्वतःच्या फोनवर तत्काळ मिळतो. प्रत्यक्ष संकटकाळी मात्र **18002703600** या टोलफ्री नंबरवरच कॉल करावा लागेल.

**४.५ संदेश जातो म्हणजे काय होते, SMS जातो की कॉल ?**
कॉल, ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे संदेश परिसरातील नागरिकांना घटना सांगणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच कॉल स्वरूपात जातो. वाहन चोरीचा संदेश SMS द्वारे १० किमी परिसरातील गावांनाही जातो.

**४.६ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदती साठीचा कॉल केल्यावर नेमकं मदतीला कोण येणार ?**
मदतीचे कॉल सर्व गावकऱ्यांना मिळत असल्याने प्रत्यक्ष घटनेचे गांभीर्य ओळखुन गावातील/परिसरातील नागरिक घटनास्थळी पोहचून मदत करतात.



Scanned with CamScanner




संकट काळात एकाच वेळी कॉल करून सर्व गावकऱ्यांना सावध करणे किंवा मदतीला बोलावण्यासाठी सर्वोत्तम यंत्रणा
सर्व गावकऱ्यांना यंत्रणेत सहभागी करून घ्या.



Scanned with CamScanner

**४.७ ग्राम सुरक्षा यंत्रणेचा कोणत्या घटनांसाठी वापरू शकतो ?**

चोरी, दरोड्याची घटना, गंभीर अपघात, निधन वार्ता, आग जळिताची घटना, विषारी सर्पदंश, विषारी साप घरात घुसणे, पिसाळलेला कुत्रा गावात येणे. बिबट्याचा हल्ला, लहान मुल हरविणे, महिलांची छेडछाड, वाहन चोरी, शेतमालाची चोरी, राशन, रॉकेल, यांचे गावात सुरू झालेले वितरण, ग्रामसभा, ग्रामपंचायतच्या योजना व सार्वजनिक कार्यक्रम यांची माहिती, गावातील शाळांकडुन दिल्या जाणाऱ्या सुचना, सरकारी कार्यालयांकडुन दिल्या जाणाऱ्या सुचना, पोलीस यंत्रणेकडुन देण्यात येणाऱ्या सुचना इत्यादी

~~वैयक्तिक संदेश, लग्न, सत्यनारायण पुजा, गॅसगाडी गावात येणे, दशक्रिया, वर्षश्राद्ध, वाढदिवस शुभेच्छा, घरातील किरकोळ वाद, बांधावरील भांडणे, बिबट्या फक्त दिसणे, विजेचे वेळापत्रक, धार्मिक किंवा जातीय तणाव निर्माण करणारे संदेश, सामाजिक शांतता धोक्यात आणणारे संदेश, ऐकिव माहिती इत्यादी किंवा असा आशय असणारे संदेश स्विकारले जात नाहीत. एकाच घटनेचा संदेश दोनदा स्विकारला जात नाही. या घटनांचे~~ कॉल स्विकारले जात नाहीत.

**४.८ ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणारी व्यक्ती गावाबाहेर संकटात सापडली तर वापर करू शकते का ?**
हो. ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणारी व्यक्ती गावाबाहेर संकटात सापडली तर कॉल करू शकते. अशा व्यक्तीचा कॉल ज्या ठिकाणी घटना घडली आहे. त्या परिसरात ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित असेल तर त्या परिसरातील नागरिकांना तसेच आपदग्रस्त व्यक्तीच्या गावात कॉल जातात.

**४.९ ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणारी व्यक्ती गावाबाहेर संकटात सापडली तर मदतीला कोण येईल ?**
ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणारी व्यक्ती गावाबाहेर संकटात सापडली तर कॉल करू शकते. अशा व्यक्तीचा कॉल ज्या ठिकाणी घटना घडली आहे त्या परिसरात ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित असेल तर त्या परिसरातील नागरिकांनाही जातात. ज्यांना शक्य असेल ते घटनास्थळी मदत करतात तसेच आपदग्रस्त व्यक्तीच्या गावात कॉल गेल्याने गावातील नागरिकही आपापल्यापरीने मदत करण्याचा प्रयत्न करतात.

**४.१० ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदतीचा कॉल मोबाईल वर आल्यावर नेमके काय करावे ?**
घटनेचे कॉल सर्व गावकऱ्यांना मिळत असल्याने घटनेचे गांभीर्य ओळखुन नागरिकांनी मदत करणे अपेक्षित आहे. घटनाग्रस्त व्यक्तीच्या फोनवर फोन करू नये. घटनास्थळी बघ्यांची गर्दी होऊ देऊ नये. गर्दीमुळे दुसरी दुर्घटना घडणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी.
**उदाहरणार्थ – चोरी दरोडा –** घरातील सर्वांनी सावध करून तरूणांनी घटनास्थळी काठी किंवा उपलब्ध हत्यारे घेवुन मदतीसाठी धाव घ्यावी. पोलीस पाटलाने पोलिसांना फोन करून माहिती द्यावी. शक्य तितक्या कमी वेळेत जास्तीत जास्त तरूणांनी घटनास्थळी पोहचावे. पोलीस पाटील व अनुभवी नागरिकांच्या सूचनेप्रमाणे पुढील निर्णय घ्यावेत.
**विषारी सर्पदंश –** सर्प मित्र असेल तर त्यास तातडीने पाचारण करावे. गावात डॉक्टर असेल तर त्यांना किंवा प्रथमोपचार करण्याची माहिती असणाऱ्या व्यक्तीला तातडीने घटनास्थळी घेवून जावे. डॉक्टरांच्या सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.
**लहान मुल हरविणे –** संदेशातील वर्णनाचे मुल आपल्या आजूबाजूला/शेतात तर नाही ना याची खात्री करावी. पोलिसांना कळवावे. मुल आढळल्यास आई वडीलांकडे सुपूर्द करावे.



Scanned with CamScanner

**बिबट्याचा हल्ला** – तरूणांनी लाठी, भाले, फटाके घेवुन घटनास्थळी धाव घ्यावी. वनीकरण अधिकाऱ्यांना/पोलिसांना कॉल करून मदतीला बोलवावे. फटाके वाजवुन बिबट्याला पळवुन लावण्याचा प्रयत्न करावा.

मदतकार्य संपल्यानंतर आपण काय बरोबर केले नी काय चुकीचे केले याची सर्वांनी एकत्रित चर्चा करावी. पुर्वानुभव विचारात घेवुन त्यानुसार पुढील वेळी अधिक नियोजनबध्द मदत करावी.

**४.११ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे लग्न, सत्यनारायण किंवा आमचे व्यक्तीगत निरोपाचे कॉल जातील का ?**

नाही. ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कोणत्याही प्रकारचे व्यक्तिगत निरोपाचे कॉल प्रसारित होत नाहीत.

**४.१२ कॉल करतांना स्वतःचे नाव, घटनेचे ठिकाण, घटनेचे स्वरूप यापैकी एखादी माहिती सांगावयाची राहिल्यास काय होईल ?**

यापैकी कोणतीही माहिती सांगावयाची राहिल्यास कॉल प्रसारित होत नाही. कॉल करतांना स्वतःचे नाव, घटनेचे ठिकाण, घटनेचे स्वरूप स्पष्ट शब्दांत व नागरिकांना समजेल अशा पध्दतीने सांगावे. कॉल करण्याअगोदर शब्द रचना शक्यतो कागदावर लिहुन घ्यावी मगच कॉल करावा. संदेश २५ सेकंदापेक्षा मोठा नसावा.

**४.१३ ग्राम सुरक्षा यंत्रणेचा गैरवापर केल्यास काय होते ?**

ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या वैशिष्ट्यपुर्ण रचनेमुळे यंत्रणेचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करणे शक्य नाही. तरीही काही तांत्रिक दोषांमुळे कुणी नागरिकांची दिशाभुल करणारा कॉल केल्यास व अशा कॉलमुळे काही जीवित वा वित्तीय हानी झाल्यास अशा व्यक्तीचा नंबर ग्राम सुरक्षा यंत्रणेतुन तात्काळ कायमस्वरूपी बंद करून गुन्हा दाखल होऊन कायदेशीर कारवाई करण्यात येते. मात्र यंत्रणेच्या स्थापनेपासून आजतागायत कधीही यंत्रणेचा गैरवापर झालेला नाही.

**४.१४ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे एखाद्याची बदनामी करणारा संदेश दिला गेला तर काय होईल ?**

ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या वैशिष्ट्यापूर्ण रचनेमुळे कोणत्याही प्रकारे बदनामी करणारे किंवा तशी वाक्यरचना असणारे कॉल प्रसारित होत नाही. तरीही काही तांत्रिक दोषांमुळे कुणी बदनामीकारक कॉल केल्यास व तशी तक्रार यंत्रणेस प्राप्त झाल्यास अशा व्यक्तीचा नंबर ग्राम सुरक्षा यंत्रणेतुन तात्काळ कायमस्वरूपी बंद करून गुन्हा दाखल होऊन कायदेशीर कारवाई करण्यात येते. मात्र आजतागायत कधीही अशा स्वरूपाचा कॉल झालेला नाही.

**४.१५ ग्राम सुरक्षा यंत्रणेस मध्यरात्री, पहाटे मदतीचा कॉल करू शकतो का ?**

ग्राम सुरक्षा यंत्रणेस २४ तास केव्हाही कॉल करू शकता, वेळेचे कोणतेही बंधन नाही.

**४.१६ ग्राम सुरक्षा यंत्रणेचे शासकीय सुट्टीच्या दिवशी कामकाज बंद असते का ?**

ग्राम सुरक्षा यंत्रणा आपत्कालीन वापरासाठी असल्याने २४ तास ३६५ दिवस कार्यरत असते व शासकीय सुट्टीच्या दिवशीही कामकाज सुरू असते.

**४.१७ आपल्या फोन मध्ये गावातील सर्व नंबर असणे गरजेचे आहे का?**

नाही. आपल्या फोन मध्ये गावातील सर्व नंबर असणे गरजेचे नाही. मात्र आपल्या गावातील जास्तीत जास्त नंबर ग्राम सुरक्षा यंत्रणेत असणे सहभागी असणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

**४.१८ माझ्या नावाचा गैरवापर करून कुणी अफवा पसरवणारा कॉल ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे केला तर काय होईल ?**
ज्या मोबाईल वरून कॉल आला आहे तो नंबर ज्या नावाने ग्रामसुरक्षा यंत्रणेत नोंदयलेला आहे त्या नावाने आलेले कॉलच प्रसारित होतात. ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या वैशिष्ट्यपुर्ण रचनेमुळे यंत्रणेचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करणे शक्य नाही. तरीही काही तांत्रिक दोषांमुळे कुणी नागरिकांची दिशाभुल करणारा कॉल केल्यास व अशा कॉलमुळे काही जीवित वा वित्तीय हानी झाल्यास अशा व्यक्तीचा नंबर ग्राम सुरक्षा यंत्रणेतुन तात्काळ कायमस्वरूपी बंद करून गुन्हा दाखल होऊन कायदेशीर कारवाई करण्यात येते. मात्र आजतागायत कधीही यंत्रणेचा अशा प्रकारे गैरवापर झालेला नाही.

**४.१८ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे काही ठराविक लोकांनाच मदतीसाठीचा कॉल देता येतो का ?**
नाही. नियमानुसार दिलेले सर्व संदेश ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणाऱ्या गावातील सर्व लोकांना जातील. काही ठराविक लोकांनाच मदतीसाठीचा कॉल देता येणे शक्य नाही.

**४.१९ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदतीचा कॉल नेमका कुणाला जातो ?**
नियमानुसार दिलेले सर्व संदेश ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणाऱ्या गावातील सर्व लोकांना जातील.

**४.२० ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे गावासाठी दिलेला कॉल गावाबाहेरील लोकांनाही जातो का ?**
नाही. ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे गावासाठी दिलेला कॉल गावाबाहेरील लोकांना जात नाही. काही आपत्ती विषयक संदेश जसे – गावात चोरी करून चोर शेजारील गावात गेल्यास त्या संबंधीत गावातील नागरिकांनाही कॉल जातो.

**४.२१ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे आलेला फोन उचलला नाही तर काय होते ?**
घटनेच्या स्वरूपानुसार किमान २ ते जास्तीत जास्त १० वेळा कॉल रिसीव्ह न केलेल्या नंबरवर कॉल देण्याचा प्रयत्न केला जातो.

**४.२२ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे आलेल्या कॉलचा आवाज व्यवस्थित ऐकु न आल्यास काय करावे ?**
ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल ज्या नंबरवरून आला आहे. त्याच नंबरवर कॉल करून आपण संदेश पुढील १ तासांपर्यंत पुन्हा पुन्हा ऐकु शकता. (सदर नंबर टोलफ्री नसल्याने आपल्या मोबाईल कंपनीच्या प्लान नुसार आपल्यास चार्जेस लागतील.)

**४.२३ ग्राम सुरक्षा यंत्रणेस मिस कॉल दिल्यास काय होते ?**
मिस कॉल दिल्यास सदर नंबरला तसे न करण्याबाबत सुचना दिली जाते. तिसऱ्या वेळी मिस कॉल आल्यास अशा नंबरची सेवा पाच दिवस तर चौथ्यांदा मिस कॉल आल्यास सेवा पूर्णपणे बंद होते.

**४.२४ ग्राम सुरक्षा यंत्रणेस लहान मुलांकडून चुकून फोन लागला तर काय होते ?**
लहान मुलांकडुन चुकून फोन लागला तर ते कॉल गावात प्रसारित होत नाहीत व सदर नंबरला तसे न करण्याबाबत सुचना दिली जाते. तिसऱ्या वेळी लहान मुलांकडुन चुकून फोन लागला तर अशा नंबरची सेवा पाच दिवस तर चौथ्यांदा लहान मुलांकडुन चुकून फोन लागला तर सेवा पुर्णपणे बंद होते.



Scanned with CamScanner

**४.२५ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदतीचा कॉल गावातील सगळ्याच फोनवर जाईल का ?**
ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदतीचा कॉल फक्त ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणाऱ्या सर्व मोबाईल जातो

**४.२६ ग्राम सुरक्षा यंत्रणेचा आजवर किती वेळा ग्रामस्थांनी वापर केला आहे. ?**
दिनांक १५ डिसेंबर २०१९ अखेर १७००० पेक्षा जास्त वेळा ग्रामस्थ / पोलीस व तालुका प्रशासनाने यंत्रणेचा यशस्वी वापर केला आहे

**४.२७ ग्राम सुरक्षा यंत्रणेचा आजवर कोणत्या प्रकारच्या घटनांसाठी ग्रामस्थांनी वापर केला आहे. ?**
चोरी, दरोड्याची घटना, गंभीर अपघात, निधन वार्ता, आग जळिताची घटना, विषारी सर्पदंश, विषारी साप घरात घुसणे, पिसाळलेला कुत्रा गावात येणे. बिबट्याचा हल्ला, लहान मुल हरविणे, महिलांची छेडछाड, वाहन चोरी, शेतमालाची चोरी, राशन, रॉकेल, यांचे गावात सुरू झालेले वितरण, ग्रामसभा, ग्रामपंचायतच्या योजना व सार्वजनिक कार्यक्रम यांची माहिती, गावातील शाळांकडुन दिल्या जाणाऱ्या सुचना, सरकारी कार्यालयांकडुन दिल्या जाणाऱ्या सुचना, पोलीस यंत्रणेकडुन देण्यात येणाऱ्या सुचना इत्यादी

**४.२८ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे ग्रामस्थांचा कॉल पोलिसांना/अग्निशमन/रूग्णवाहिका यांनाही दिला जातो का ?**
घटनेच्या स्वरूपानुसार ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे कॉल पोलिसांना/अग्निशमन/रूग्णवाहिका यांनाही दिला जातो. मात्र घटनेचे कॉल सर्व गावकऱ्यांना मिळत असल्याने प्रत्यक्ष घटनेचे गांभीर्य ओळखुन नागरिकांनी घटनास्थळी पोहचून संबंधित यंत्रणांना कॉल करून घटनेची माहिती देणे अपेक्षित आहे.

**४.२९ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदतीचा कॉल सर्व गावकऱ्यांनी ऐकला आहे याची खात्री काय ?**
घटनेच्या स्वरूपानुसार किमान २ ते जास्तीत जास्त १० येळा कॉल रिसीव्ह न केलेल्या नंबरवर कॉल देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सर्व नागरिकांनी कॉल मिळाला असण्याची शक्यता ९५% असते. फक्त मोबाईल बंद असणे किंवा नेटवर्क च्या दोषांमुळे कॉल मिळाला नाही असे घडू शकते.

**४.३० गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावात पळून गेल्यास काय करावे ?**
संदेश योग्य पध्दतीने व नियमानुसार रेकॉर्ड करतांनाच चोर पळालेल्या गावाचे नाव स्पष्ट सांगावे. कॉल संबंधित गावातील नागरिकांनाही जातो.

**४.३१ आमच्या समोर अनोळखी व्यक्तीचा अपघात झाला तर नेमकी कॉल मध्ये कशी माहिती द्यावी ?**
संबंधित अनोळखी व्यक्तीचा मोबाईल प्रथम शोधुन त्याच्याच मोबाईलवरून यंत्रणेस कॉल करून- "मी......बोलतोय.......या ठिकाणी सदर मोबाईल असणाऱ्या व्यक्तीचा अपघात झाला आहे" अशा पध्दतीने संदेश द्यावा. संबंधित अनोळखी व्यक्ती ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी नसेल तर आपण आपल्या स्वतःच्या फोनवरून कॉल करून माहिती द्यावी. कॉल परिसरातील सर्व नागरिकांना जाईल. मदत मिळेल.


Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

**रामदास खेडकर**
निवासी उपजिल्हाधिकारी
तथा
अपर जिल्हा दंडाधिकारी, नाशिक.

अ.शा.प.क्र. 46/2019
जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालय,
दूरध्वनी : (०२५३) २५७८५०१
पीबीएक्स : २३१९००६
फॅक्स : (०२५३) २५८१७००
दिनांक : 23/०८ /२०१९

श्री. डी.के.गोर्डे
संचालक, नागरी सुरक्षा सेवा, पुणे.

नाशिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रभागाने मान्सून कालावधीत दिनांक 30 जुलै ते 6 ऑगस्ट 2019 दरम्यान अधिकारी,व गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना तत्काळ सूचना देण्यासाठी ग्राम सुरक्षा यंत्रणा (18002703600) कार्यान्वित केली होती. त्यात गोदावरी नदी ज्या तालुक्यांतून वाहते त्या तालुक्यातील संबंधित अधिकारी व नागरिक यांचे मोबाईल नंबर ग्राम सुरक्षा यंत्रणेत नोंदवून घेतले होते. संदेश देणारे वरिष्ठ अधिकारी म्हणून मा. जिल्हाधिकारी श्री. सुरज मांढरे व मा. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. रामदास खेडकर यांचे नंबर नोंद्विलेले होते, तर इतर 4000 नंबरवर वरिष्ठांनी दिलेले संदेश तत्काळ प्रसारित होत होते.

**नाशिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रभागास झालेला फायदा.**

1. धरणातून विसर्ग सुरु होण्यापूर्वी माहिती नदीकाठच्या नागरिकांना तत्काळ मिळत होती.
2. धोकादायक परिसरात न जाण्याबाबत व सतर्क राहण्याबाबत सुचना देण्यास मदत झाली.
3. एकाच वेळी 4000 सक्षम अधिकारी व नागरिकांना सूचना मिळाल्याने परिणामकारकता वाढली. नागरिकांचे सहकार्य मिळण्यास मदत झाली.
4. पूर काळात सोशल मिडीयात पसरणाऱ्या अफवांना परिणामकारक प्रतिबंध करण्यास मदत झाली.
5. कंट्रोल रूम कडून अधिकारी व नागरिकांना जलद सुचना मिळत असल्याने आपत्ती व्यवस्थापन विभागास नियोजनबद्ध मदतकार्य करण्यास मदत झाली.
6. पूर ओसरल्यानंतरही स्वच्छतेबाबत सूचना देण्यास मदत झाली.
7. नागरिक व प्रशासनात योग्य ताळमेळ बसवत मदतकार्य पार पडण्यास मदत झाली.

दिनांक 30 जुलै ते 6 ऑगस्ट या 8 दिवसात पूर परिस्थिती हाताळण्यासाठी 6 वेळा संदेश प्रसारित करण्यात आले. सदर प्रत्येक संदेश 4000 मोबाईल नंबरवर कॉल स्वरूपात प्रसारित झाला. ग्राम सुरक्षा यंत्रणा आपत्कालीन संपर्काचे प्रभावी माध्यम ठरु शकते. पोलीस यंत्रणा व जिल्हा प्रशासनास भविष्यात ग्राम सुरक्षा यंत्रणा उपयुक्त ठरेल.

शुभेच्छासह

(रामदास खेडकर)
निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक

**अतिवृष्टीमुळे गोदावरी नदीला 30 जुलै ते 6 ऑगस्ट 2019 दरम्यान आलेल्या पुरामुळे उद्भवलेल्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, नदीकाठच्या सर्व नागरिकांना तसेच पूर नियंत्रण कर्मचारी अधिकारी यांना, मा. जिल्हाधिकारी, नाशिक, यांनी नागरी सुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून सातत्याने सूचना व निर्देश दिले. पूर परिस्थिती यशस्वी रीत्या हाताळण्यास यंत्रणेची मदत झाली.**



Scanned with CamScanner

**४.३२ गावात वाहन चोरी झाली आहे तर आजुबाजूच्या गावांना कसे सावध करावे ?**
कॉलमध्ये स्वतःचे नाव, वाहनाचा प्रकार, वाहनाचा नंबर व रंग यांचा स्पष्ट उल्लेख असावा. वाहन चोरीचा संदेश SMS द्वारे १० किमी परिसरातील गावांनाही जातो. चोरीची घटना घडल्यापासुन १ तासांच्या आत कॉल दिल्यास ९५% वेळा वाहने मिळतात. रात्री वाहन चोरी झाल्याचे सकाळी निदर्शनास आल्यास विना विलंब यंत्रणेचा वापर करावा.

**४.३३ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे माहिती देण्यासाठी किंवा मदतीचा कॉल कोण करू शकते ?**
ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी असणारा कोणताही नागरिक ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे माहिती देण्यासाठी किंवा मदतीचा कॉल करू शकतो. सार्वजनिक कार्यक्रमांचे कॉल सरपंच, ग्रामसेवक, ग्रा.पं.सदस्य, ग्रा.पं.कर्मचारी, पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष यांनी केला असेल तरच प्रसारित होतो.

**४.३४ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मदतीचा कॉल करतांना नेमकी काय काळजी घ्यावी ?**
कॉल करतांना स्वतःचे नाव, घटनेचे ठिकाण, घटनेचे स्वरूप शब्दांत व नागरिकांना समजेल अशा पध्दतीने सांगावे. कॉल करण्याअगोदर शब्द रचना शक्यतो कागदावर लिहुन घ्यावी व मगच कॉल करावा. संदेश २५ सेकंदांपेक्षा मोठा नसावा.

**४.३५ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे सार्वजनिक कार्यक्रम योजनांची माहिती कोण देवू शकते ?**
सार्वजनिक कार्यक्रमांचे कॉल सरपंच, ग्रामसेवक, ग्रा.पं.सदस्य, ग्रा.पं. कर्मचारी, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष यांनी केला असेल तरच प्रसारित होतो.

**४.३६ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे 'ब्लॅक लिस्ट' झालेले नंबर परत सुरू करता येतात का ?**
होय. ग्रामपंचायतने/पोलीस पाटलांनी शिफारस केल्यास ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे 'ब्लॅक लिस्ट' झालेले नंबर परत सुरू करता येतात.

**४.३७ ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे मोबाईलवर कॉल आल्यास घटना नेमके कुठे घडली हे कसे काय कळेल ?**
प्रत्येक कॉल मध्ये घटनेच्या ठिकाणाचा उल्लेख असल्याशिवाय आपणास कॉल प्रसारित होत नाहीत. ग्रामसुरक्षा यंत्रणेचा प्रत्येक कॉल काळजीपुर्वक ऐकावा.

**४.३८ ग्राम सुरक्षा यंत्रणेचा संकट काळातील वापराव्यतिरिक्त आणखी कोणकोणत्या कारणांसाठी यंत्रणेचा वापर करू शकतो ?**
राशन, रॉकेल, यांचे गावात सुरू झालेले वितरण. ग्रामसभा, ग्रामपंचायतच्या योजना व सार्वजनिक कार्यक्रम यांची माहिती गावातील शाळांकडुन दिल्या जाणाऱ्या सुचना, सरकारी कार्यालयांकडुन दिल्या जाणाऱ्या सुचना, हवामान विषयक माहिती इ.

**४.३९ ग्राम सुरक्षा यंत्रणेचे ग्राहक सेवा केंद्र आहे का ?**
होय. ग्राम सुरक्षा ग्राहक सेवा केंद्राचा नंबर **022 48931236** आहे. अधिकारी मराठी भाषेतुन ग्राम सुरक्षा यंत्रणेविषयी आपल्या शंकाचे निरसन करतात. येथे होणारे आपले संभाषण प्रशिक्षणासाठी रेकॉर्ड केले जाते.




Scanned with CamScanner

# <u>ग्राम सुरक्षा यंत्रणा</u>

## <u>महत्वाच्या लिंक्स</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्राम सुरक्षा यंत्रणा माहिती पुस्तिका | http://gramsu.com/app/GSY_INFO.pdf | |
| २) | ग्राम सुरक्षा यंत्रणा बातमीपत्र | http://gramsu.com/News.pdf | |
| ३) | ग्राम सुरक्षा यंत्रणा नंबर नोंदणी aap | http://gramsu.com/app/GSY_App.apk | |

## विविध प्रसंगात प्रभावी वापर कसा करावा नाट्य रुपांतर

| | | | |
|---|---|---|---|
| १) | दरोडा |  | |
| २) | बिबट्याचा हल्ला |  | |
| ३) | सर्पदंश |  | |
| ४) | पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला |  | |
| 5) | आग जाळिताची घटना |  | |
| ६) | अपघात |  | |

महाराष्ट्र शासन

रोहिदास पवार

अपर पोलीस अधीक्षक
श्रीरामपूर

अ. शा. पत्र क्रमांक : ४६/१८
अपर पोलीस अधीक्षक कार्यालय
श्रीरामपूर
☎ : (ऑ.) (०२४२२) २२४६८८

दिनांक : २/११/१८



मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री महोदय यांचे शिर्डी दौऱ्या दरम्यान दिनांक १८ व १९ आक्टोंबर २०१८ रोजी ग्रामसुरक्षा यंत्रणा (18002703600) कार्यान्वीत करण्यात आली होती. बंदोबस्त नियुक्तीवर असणारे सर्व २५०० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईल नंबर यंत्रणेत सहभागी करुन घेण्यात आले होते. बंदोबस्त कालावधीत ग्रामसुरक्षा यंत्रणेचा विविध सुचना व आदेश सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देण्यासाठी पोलीस यंत्रणेने सहजतेने वापर केला व सर्व बंदोबस्त नियुक्तीवर असणारे २५०० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना एकाच वेळी निरोप/सुचना पोहचवल्या.

ग्रामसुरक्षा यंत्रणा आपत्कालीन संपर्काचे प्रभावी माध्यम ठरु शकते. पोलीस यंत्रणा व जिल्हा प्रशासनास सुध्दा आपत्कालीन संपर्कासाठी ग्रामसुरक्षा यंत्रणा उपयुक्त टरेल.

शुभेच्छासह

आपला स्नेहांकित

(रोहिदास पवार)

श्री.डी.के.गोर्डे,
संचालक, ग्रामसुरक्षा यंत्रणा,

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# ग्राम सुरक्षा यंत्रणा

## महत्वाच्या लिंक्स

| अ.नं. | संदर्भ | लिंक |
|---|---|---|
| 1 | ग्राम सुरक्षा यंत्रणा नंबर नोंदणी aap | http://gramsu.com/app/GSY_App.apk |
| 2 | ग्राम सुरक्षा यंत्रणा नंबर नोंदणी Video | https://www.youtube.com/watch?v=aH_rUz-slro |
| 3 | ग्राम सुरक्षा यंत्रणा माहिती पुस्तिका | http://gramsu.com/app/GSY_INFO.pdf |
| 4 | ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रकल्प अहवाल | http://gramsu.com/app/14._GSY.pdf |
| 5 | नाशिक शहर पोलीस प्रात्यक्षिक Video | https://abpmajha.abplive.in/videos/special-report-on-hi-tech-nashik-police-679795 |
| 6 | संगमनेर पोलीस प्रात्यक्षिक Video | https://www.youtube.com/watch?v=-Zrq05DVF2I |
| 7 | ग्रामसुरक्षा यंत्रणा Video | http://gramsu.com/Video.mp4 |
| 8 | जामखेड पोलीस प्रात्यक्षिक Video | https://www.youtube.com/watch?v=2PhOhl9Q1UM |
| 9 | इंदिरानगर पोलीस प्रात्यक्षिक Video | https://www.youtube.com/watch?v=JmJglSvJwWY |
| 10 | ग्रामसुरक्षा यंत्रणा बातमीपत्र PDF | http://gramsu.com/News.pdf |

# विविध प्रसंगात प्रभावी वापर कसा करावा

## नाट्य रुपांतर

| अ.नं. | घटना | | लिंक |
|---|---|---|---|
| 1 | दरोडा |  | http://gramsu.com/Robbery.mp3 |
| 2 | बिबट्याचा हल्ला |  | http://gramsu.com/Leopard_Attack.mp3 |
| 3 | सर्पदंश |  | http://gramsu.com/audio/Snakebite.mp3 |
| 4 | पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला |  | http://gramsu.com/audio/MadDog_Attack.mp3 |
| 5 | आग जाळिताची घटना |  | http://gramsu.com/audio/Firecase.mp3 |
| 6 | अपघात |  | http://gramsu.com/audio/RoadAccident.mp3 |

# मा. श्री. डी.के. गोर्डे, संचालक
# यांची ऑल इंडिया रेडीओ वर झालेली मुलाखत

| अ.नं. | घटना | लिंक |
|---|---|---|
| 1 |  भाग 1 | http://gramsu.com/r_1.mp3 |
| 2 |  भाग 2 | http://gramsu.com/r_2.mp3 |
| 3 |  भाग 3 | http://gramsu.com/r_3.mp3 |
| 4 |  भाग 4 | http://gramsu.com/r_4.mp3 |